## जाहिरात सूचना

**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामिण रोजगार हमी योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीकरीता मनुष्यबळ पुरविणाऱ्या संस्थेकडून अर्ज मागविण्याबाबत.**

महाराष्ट्र शासन नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई शासन परिपत्रक क्र.मग्रारोहयो-२०१०/ प्र.क्र.७/रोहयो-१०अ, दिनांक १६ डिसेंबर २०१० अन्वये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामिण रोजगार हमी योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीकरीता जिल्हाधिकारी (रोहयो शाखा) गोंदिया तालुका पंचायत समितीस्तवर मनुष्यबळ लिपिक-नि-डेटा एन्ट्री ऑपरेटर, कृषि सहायक, कनिष्ठ अभियंता,सहायक कार्यक्रम अधिकारी बाहयस्थ पध्दतीने उपलब्ध करुन देण्याकरीता स्थानिकरित्या लिपिक-नि-डेटा एन्ट्री ऑपरेटर, कृषि सहायक, कनिष्ठ अभियंता,सहायक कार्यक्रम अधिकारी यांचे (Bio-data) सह मनुष्यबळ पुरविणाऱ्या संस्थेकडून अर्ज मागविण्यात येत आहे .

अटी व शर्ती, अर्ज स्वीकारण्याचा दिनांक, मुलाखतीचा दिनांक तसेच संस्थेद्वारे करावयाचा अर्जाचा नमुना www.gondia.gov.in या वेबसाईटवर सूचना Link मध्ये उपलब्ध आहेत.

उपजिल्हाधिकारी (रोहयो)
गोंदिया.

<u>जाहिरात सूचना</u>

**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामिण रोजगार हमी योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीकरीता मनुष्यबळ पुरविणाऱ्या संस्थेकडून अर्ज मागविण्याबाबत.**

महाराष्ट्र शासन नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई शासन परिपत्रक क्र.मग्रारोहयो-२०१०/ प्र.क्र.७/रोहयो-१०अ, दिनांक १६ डिसेंबर २०१० अन्वये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामिण रोजगार हमी योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीकरीता जिल्हास्तरावर तसेच तालुका पंचायत समितीस्तवर मनुष्यबळ लिपिक-नि-डेटा एन्ट्री ऑपरेटर कृषी सहायक, कनिष्ठ अभियंता, सहायक कार्यक्रम अधिकारी बाहयस्थ पध्दतीने उपलब्ध करुन देण्याकरीतां स्थानिकरित्या मनुष्यबळ पुरविणाऱ्या संस्थेकडून अर्ज मागविण्यात येत आहे.

**अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत.**

१) मनुष्यबळ पुरविणारी संस्था स्थानिकरित्या पंजिकृत असावी.
२) यापूर्वी शासकीय/निमशासकीय कार्यालयात मनुष्यबळ पुरविल्याचा अनुभव असला पाहिजे.
३) मनुष्यबळ पुरविणाऱ्या संस्थेकडे अनुभवी लिपिक-नि-डेटा एन्ट्री ऑपरेटर कृषी सहायक, कनिष्ठ अभियंता, सहायक कार्यक्रम अधिकारी प्रशिक्षित असले पाहीजे.
४) मनुष्यबळ पुरविणाऱ्या संस्थेकडे लिपिक-नि-डेटा एन्ट्री ऑपरेटर कृषी सहायक, कनिष्ठ अभियंता, सहायक कार्यक्रम अधिकारी प्रशिक्षित अनुभवी असलेले डेटा एन्ट्री ऑपरेटर यांना तालुका/पंचायत समिती येथे नेमणूक दिल्यानंतर काम करण्याची तयारी असली पाहीजे.
५) मनुष्यबळ पुरविणाऱ्या संस्थेंना प्रती मनुष्यबळ रु. ५००/- इतके सेवा शुल्क अदा करण्यात येईल.
६) मनुष्यबळ पुरविणाऱ्या संस्थेंना लिपिक-नि-डेटा एन्ट्री ऑपरेटर कृषी सहायक, कनिष्ठ अभियंता, सहायक कार्यक्रम अधिकारी यांचेकरिता अनुज्ञेय मानधन हे संस्थेला अदा करण्यात येईल, मानधनाची रक्कम संबंधितांना अदा करण्याची सर्वस्वी जबाबदारी ही संस्थेची असेल.
७) राज्य निधीकडून /शासनाकडून जाहिरातीत नमूद केलेले मनुष्यबळ पुरविल्यास,संस्थेकडील पुरविण्यात आलेल्या मनुष्यबळास तात्काळ कार्यमुक्त करण्याची जबाबदारी संस्थेची राहील. तसेच सदर करारनामा रदद करण्यात येईल.
८) संस्थेकडून पुरविण्यात आलेल्या मनुष्यबळाला शासकीय नौकरीत कोणतेही हक्क बजावता येणार नाही अथवा काही प्रसंगी न्यायालयात मनुष्यबळाने नोकरीबाबत दावा केल्यास त्याबाबत न्यायालयीन प्रक्रियेची सर्वस्वी जबाबदारी संस्थेची राहील.
९) मनुष्यबळ पुरविणाऱ्या संस्थेला अनामत रक्कम रु. १०,०००/- चा राष्ट्रीयकृत बँकेचा डिमांड ड्रॉफ्ट उपजिल्हाधिकारी, (रोहयो) गोंदिया यांचे नांवाने जोडण्यात यावा.
१०)मनुष्यबळ कमी करणे वा वाढविणे या कार्यालयाने आदेश निर्गमित केल्यानंतर त्याची प्रभावी अंमलबजावणी करणे ही संस्थेची जबाबदारी राहील.
११) वरील अटी व शर्तीपैकी कोणत्याही अट शिथिल करण्याचे अधिकार मा. जिल्हाधिकारी यांनी राखून ठेवलेले आहेत.
१२) मनुष्यबळ पुरविणाऱ्या संस्थेची मुलाखतीद्वारे निवड करण्यात येईल.
१३) बाहयस्थ पध्दतीने मनुष्यबळ पुरविणाऱ्या संस्थेची निवड झाल्यानंतर त्यांचेकडून किमान एक वर्षाकरीता करारनामा करून द्यावा लागेल. करारनाम्यास मुदतवाढ देणे किंवा करारनामा रद्द करण्याचे सर्वस्वी अधिकार मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम समन्वयक यांचेकडे राखून ठेवलेले आहेत.

२/-

वरील अटी व शर्ती मान्य असल्यास लिपिक-नि-डेटा एन्ट्री ऑपरेटर कृषी सहायक, कनिष्ठ अभियंता, सहायक कार्यक्रम अधिकारी यांचे (Bio-data) सह खालील बाहयस्थ मनुष्यबळ पुरविणाऱ्या संस्थेने सोबत जोडलेल्या विहित नमुन्यात अर्ज जिल्हाधिकारी, रोहयो शाखा गोंदिया यांचेकडे अर्ज करावेत.

| अ.क्र. | तपशील | तारीख |
|---|---|---|
| १ | अर्ज स्वीकारण्याची तारीख | ११/७/२०१४ ते २८/७/२०१४ |
| २ | अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख | २८/७/२०१४ दुपारी ३.०० वा. |
| ३ | मुलाखतीचा तारीख | ३०/७/२०१४ दुपारी १२.०० वा. |

उपजिल्हाधिकारी (रोहयो)
गोंदिया

# बाहयस्थ पध्दतीने मनुष्यबळ पुरविणाऱ्या संस्थेकरीता अर्ज

विषय :- महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामिण रोजगार हमी योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीकरीता बाहयस्थ पध्दतीने मनुष्यबळ पुरविणाऱ्या संस्थेकडून अर्ज मागविण्याबाबत. २०१४-२०१५ या वर्षाकरिता.

-------oo--------

१) सस्थेचे नांव :-

४) संस्थेचा पत्रव्यवहारासाठी संपूर्ण पत्ता व दूरध्वनी क्रमांकासह :-

३) संस्थेचा पंजिकृत नोंदणी क्रमांक :-

५) यापूर्वी शासकीय कामाकरीता बाहयस्थ पध्दतीने मनुष्यबळ पुरविल्याचा अनुभव. :-

४) संस्थेकडे उपलब्ध असलेले प्रशिक्षित मनुष्यबळ लिपिक-नि-डेटा एन्ट्री ऑपरेटर, कृषी सहायक, कनिष्ठ अभियंता, सहायक कार्यक्रम अधिकारी ची प्रत्येकांची संख्या (Bio data) सह :-

५) अनामत रक्कम (इ.एम.डी.) डिमांड ड्राफ्ट क्रमांक व दिनांक :-

६) जाहिरातीमधील अटी व शर्ती मान्य आहेत काय? :-

ठिकाण :-

दिनांक :-

संस्थाचालकाची स्वाक्षरी व नांव

प्रति,
मा. जिल्हाधिकारी तथा
जिल्हा कार्यक्रम समन्वयक
मग्रारोहयो, गोंदिया.